सत्यमेव जयते

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१

barti

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६०० / २६३३३३३० /२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, बार्टी मार्फत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील उमेदवारांसाठी दिनांक १० डिसेंबर, २०२४ व दिनांक १६ डिसेंबर, २०२४ पासून सुरु होणाऱ्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याकरीता निवड करण्यात आलेल्या प्रशिक्षण संस्थाना सर्वसाधारण सूचना**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि.३०/१०/२०२३ च्या शासन निर्णयानुसार सन २०२४-२५ पासून शासनाच्या सर्वकष धोरणांतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, बार्टी मार्फत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोग( MPSC) - राज्यसेवा परीक्षा (State Service), न्यायिक सेवा (JMFC), अभियांत्रिकी सेवा परीक्षा(MES), गट "ब" व "क"(Group B&C) स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम योजना राबविण्यात येतात. उपरोक्त नमूद परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत ई-निविदा प्रक्रीयेद्वारे खाजगी प्रशिक्षण संस्थांना नामनिर्देशित (Empanel) करण्यात आले आहे. उमेदवारांना प्रशिक्षण संस्था निवडीकरीता विकल्प पोर्टल उपलब्ध करून देण्यात आले असून विद्यार्थ्यांच्या पसंतीनुसार प्रशिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यांच्या मूळ कागदपत्रांची तपासणी केली आहे. दि.१० डिसेंबर, २०२४ व दि.१६ डिसेंबर, २०२४ पासून प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात येत आहे. तरी उपरोक्त नमूद प्रशिक्षण कार्यक्रमाकरीता नामनिर्देशित (Empanel) केलेल्या प्रशिक्षण संस्थासाठी खालील सुचना निर्गमित करण्यात येत आहे. तरी निवड करण्यात आलेल्या सर्व प्रशिक्षण संस्थानी खालील सूचना काळजीपूर्वक वाचणे व त्याप्रमाने कार्यवाही करणे बंधनकारक आहे.

१. प्रशिक्षण संस्थानी प्रशिक्षण कार्यक्रम संदर्भात किंवा विद्यार्थ्यांच्या बाबतीत काही शंका/अडचण असल्यास योजना विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, बार्टी यांच्याशी संपर्क साधावा.
२. प्रशिक्षण संस्थेने त्यांच्याकडे प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांच्या मूळ कागदपत्रांची तपासणी करून त्याबाबतचा सविस्तर अहवाल या कार्यालयास प्रशिक्षण सुरु झाले पासून ७ दिवसांच्या आत सादर करावा. तसेच Competitive Pre-Examination Training Implementation & Monitoring या पोर्टलवर प्रवेशित विद्यार्थ्यांची संपूर्ण माहिती सादर करणे अनिवार्य आहे.
३. प्रशिक्षण संस्थेकडील प्रवेशित विद्यार्थी हे महाराष्ट्र राज्याचे रहिवासी व अनुसूचित जातीचे असावे.
४. उमेदवाराकडे महाराष्ट्र राज्याचे अनुसूचित जातीचे जात प्रमाणपत्र असणे अनिवार्य आहे.
५. प्रशिक्षण संस्थेने संबंधित प्रशिक्षण योजनेच्या संपूर्ण कालावधी दरम्यान पूर्ण करण्यात येणारा अभ्यासक्रम, सराव चाचण्या व विशेष मार्गदर्शन सत्र या सर्व बाबीचा नियोजन आराखडा, प्रशिक्षकांची नियोजित वेळापत्रकानुसार विषय निहाय यादी प्रशिक्षण वर्ग सुरु होण्यापूर्वी या कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे.
६.प्रशिक्षण संस्थेने प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण कार्यक्रमाबाबत समुपदेशन करावे.

७. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, बार्टी यांचेकडून सामंजस्य करार व कार्यारंभ आदेशात नमूद केलेल्या अटी व शर्ती नुसार सर्व करांसहित प्रशिक्षण केंद्रास प्रती विद्यार्थी प्रशिक्षण शुल्क देय असेल.

८. प्रशिक्षण संस्थेने टप्पानिहाय प्रशिक्षण शुल्काची मागणी करतेवेळी मागणी पत्रासोबत तीन वेगळया प्रतीमध्ये वस्तू व सेवा कर (GST) सहीतचे देयक (GST Invoice) या कार्यालयात सादर करणे अनिवार्य आहे.

९. प्रशिक्षणाकरीता प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांना प्रसिद्ध करण्यात आलेल्या ई-निविदामध्ये नमूद केल्याप्रमाणे अभ्यास साहित्य अभ्यासिका, स्पर्धा परीक्षा मासिक, स्व प्रकाशन असलेले पुस्तके / क्लास नोट्स, सराव चाचण्या या सर्व बाबी निःशुल्क स्वरुपात देणे प्रशिक्षण संस्थेस बंधनकारक राहील.

१०. सदर योजनेच्या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी दिलेल्या विहीत कालावधीसाठी प्रशिक्षण कार्यक्रम घेणे प्रशिक्षण संस्थाना बंधनकारक आहे.

११. ई-निविदा मध्ये तसेच सामंजस्य करार व कार्यारंभ आदेशात नमूद केल्याप्रमाणे विद्यार्थ्यांना सर्व सोयी-सुविधा निशुल्क उपलब्ध करून देणे बंधनकारक असेल.

१२. प्रशिक्षण कालावधी दरम्यान विद्यार्थ्यांची बायोमेट्रिक उपस्थिती पत्रक व सीसीटीवी फुटेज दर महिन्याच्या पहिल्या आठवडयात या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील. प्राप्त बायोमेट्रिक उपस्थिती अहवालानुसारच ७५% पेक्षा जास्त उपस्थिती असलेल्या पात्र विद्यार्थ्यांना थेट लाभ हस्तांतरण (DBT) द्वारे विद्यार्थ्यांनी दिलेल्या बँक खात्यावर विद्यावेतनाची रक्कम जमा केली जाईल याची पूर्वकल्पना विद्यार्थ्यांना दयावी.

१३. प्रवेशित विद्यार्थ्यांना प्रशिक्षण कालावधीमध्ये कुठेही शासकीय/निमशासकीय खाजगी नोकरी करता येणार नाही. तसे आढळल्यास किंवा याबाबत या कार्यालयास काही तक्रार प्राप्त झाल्यास संबंधित विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द करण्यात येईल. तसेच प्रशिक्षण कालावधी दरम्यान किंवा तद्नंतर प्रवेशित विद्यार्थ्यांची शासकीय/निमशासकीय सेवेत निवड झाल्यास त्याबाबतची माहिती या कार्यालयास तात्काळ कळविणे प्रशिक्षण संस्थेस बंधनकारक असेल.

१४. भविष्यात कोविड-१९ सारखी किंवा तत्सम नैसर्गिक आपत्ती निर्माण झाल्यास अपवादात्मक परिस्थितीमध्ये प्रशिक्षण ऑनलाईन स्वरुपात घेण्याची गरज भासल्यास प्रशिक्षण संस्थेने विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रशिक्षण देणे बंधनकारक राहील. याकरीता डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, बार्टी संस्थेची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक असेल. बार्टी, पुणे यांची पुर्वपरवानगी न घेता कोणत्याही विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात येऊ नये.

१५. उपरोक्त नमूद प्रशिक्षण योजनेसंबंधित अभ्यासक्रमामध्ये वेळोवेळी होणा-या बदलानुसार विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणे प्रशिक्षण संस्थांना बंधनकारक असेल.

१६. प्रशिक्षण केंद्रास या कार्यालयातील अधिकारी कोणत्याही वेळी तपासणीसाठी भेट देतील, त्यावेळी संबंधित अधिका-यांना प्रशिक्षणासंबंधित सर्व अभिलेखे व दस्तावेज उपलब्ध करून देणे प्रशिक्षण संस्थेला अनिवार्य राहील.

१७. प्रशिक्षण संस्थेला संपूर्ण प्रशिक्षण कालावधी दरम्यानचे सर्व सीसीटीव्ही फुटेज जतन करून ठेवणे बंधनकारक असेल. वेळोवेळी या कार्यालयाकडून मागणी झाल्यास ते उपलब्ध करून देण्याची जबाबदारी प्रशिक्षण संस्थेवर राहील.

१८. ई-निविदेत नमूद असल्याप्रमाणे प्रशिक्षण वर्गाची विद्यार्थी कमाल मर्यादा ५० विद्यार्थी असणे बंधनकारक राहील.

१९. प्रशिक्षण संस्थेने प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्याचा सविस्तर अहवाल (विद्यार्थ्यांचा व प्रशिक्षकांचे अभिप्राय, प्रशिक्षण कालावधीतील छायाचित्रे, इ.) या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

२०. योजनेच्या अंमलबजावणी करताना जर काही अडचण आल्यास प्रशिक्षण संस्थांनी संबंधित योजनेकरीता प्राधिकृत केलेल्या समन्वयकांशी संपर्क साधावा.

२१. प्रशिक्षण सुरु असताना विद्यार्थ्यांना शासकिय नोकरी प्राप्त झाल्यास अथवा प्रशिक्षण अर्धवट सोडल्यास याबाबत बार्टी, पुणे यांना अहवाल सादर करणे बंधनकारक असेल.

२२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, बार्टी मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या लाभाच्या स्वरुपाची माहिती https://barti.maharashtra.gov.in या संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येते. त्यामुळे योजनांबद्दल नवीन माहिती जाणून घेण्यासाठी उपरोक्त नमूद संकेतस्थळाला वेळोवेळी भेट देऊन माहिती घ्यावी.

स्वा.

(सुनिल वारे)

**महासंचालक**

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व**

**प्रशिक्षण संस्था, (बार्टी),पुणे**